# प्रेसनोट दि. २५/०५/२०१९

## “अंमली पदार्थ विक्रीचा व्यवसाय करणा-या पती, पत्नी, आई-वडील अशा संपुर्ण कुटुंबास अटक”

काल दिनांक २४/०५/२०१९ रोजी बातमीदार मार्फत मिळालेल्या बातमी वरुन सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री. भानुप्रताप बर्गे, व गुन्हे शाखे कडील अधिकारी व कर्मचारी यांनी सर्वे नं. ५२/४, मदर तेरेसा स्कुल जवळ, गलांडे नगर, वडगाव शेरी, पुणे या ठिकाणी छापा टाकुन **एकाच कुटुंबातील** खालील **चार व्यक्तींना** एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २९ प्रमाणे अटक केली असुन त्यांचे ताब्यातुन वेगवेगळया **४९ पाकिटातील एकुण ५९९** ग्रॅम वजनाचा कि.रु. ८,९८५/- चा **गांजा हा अंमली पदार्थ** जप्त करण्यात आला आहे.

अटक केलेले आरोपी नावे

१) **हुसेन कादर शेख**, वय-२८ वर्षे रा. सर्वे नं. ५२/४, मदर तेरेसा स्कुल जवळ, गलांडे नगर, वडगाव शेरी, पुणे

२) **कादर अब्दुल शेख**, वय-६१ वर्षे रा. सदर

३) **मुमताज कादर शेख**, वय-४८ वर्षे, रा. सदर

४) **जबीन हुसेन शेख**, वय-२३ वर्षे रा. सदर

वरिल आरोपींचे विरुध्द **चंदननगर पोलीस स्टेशन**, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नंबर २२३/२०१९ एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील कारवाईत श्री. भानुप्रताप बर्गे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पुणे शहर यांचेसह सहा. पोलीस निरीक्षक सतिश वाळके, म.सहा.पो.निरी. अनिता खेडकर, पोलीस शिवाजी राहिगुडे, जितेंद्र तुपे, म.पो.हवा. कविता नलावडे, पो.ना. सुधीर इंगळे, राहुल सकट, पो.शि. शंकर संपते यांनी सहभाग घेतला आहे.